


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

**आजचा सामना**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि.कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : बंगळुरु

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २९ मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १७९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२



# त्यांनी बंगला दाखवला, यांनी बाप काढला, तर त्यांनी लाज काढली!



## दारूगोळा, फटाके आणि उखळी बॉम्बची 'विकासा'ला श्रध्दांजली

**सोलापूर लोकसभा मतदारसंघातील निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर होईल, या अपेक्षेचा पार भंग झालाय! काँग्रेसच्या प्रणिती शिंदे आणि भाजपाचे राम सातपुते यासारखे तरूण, उच्चशिक्षीत सुसंस्कृत उमेदवार लाभल्याने ही निवडणूक आदर्श ठरेल ही आशा दोघाही उमेदवारांनी पार धुळीला मिळवली आहे. कार्यकर्त्यांतून सुरू झालेल्या सोशलमिडिया वॉरचे नेतृत्व दोन्ही उमेदवारांनी स्वत:कडे घेत युध्दात उडी घेतल्याने यांचे कान पिळायचे कोणी हा प्रश्न निर्माण झाला आहे.**

सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात निवडणुकीच्या प्रचाराचे रणांगण आता चांगलेच तापले आहे. आमदार राम सातपुते आणि आमदार प्रणिती शिंदे यांच्यात व्यक्तिगत टीकेचे उखळी बॉम्ब फुटू लागले आहेत, ज्याच्या ठिकऱ्या मतदार संघात पोचत आहेत. यावरून इथली निवडणूक संघर्षाच्या वळणावर जात आहे. आमदार राम सातपुते यांच्यावर शाब्दिक हल्ला चढविताना आमदार प्रणिती शिंदे यांनी त्यांची थेट लाज काढली, एवढ्या वरच प्रणिती थांबल्या नाहीत, माझ्याशी भिडा, मी उमेदवार आहे, माझ्या वडिलांवर कशा बोलता, तुम्हाला लाज वाटली पाहिजे' असे म्हणत त्यांनी आमदार राम सातपुते यांना सोलापुरी भाषेत जणू दम भरला.

दरम्यान, आक्रमक असलेले आमदार राम सातपुते यांनी मी बोलणारच. काँग्रेसने घराणेशाही केली आहे. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन बालपण गेलेल्याला काँग्रेसने उमेदवारी दिली आहे. गरीब घरातील उमेदवार काँग्रेसकडे नव्हते का? असे प्रत्यूत्तर दिले.

लोकसभा निवडणूक जवळ येऊ लागताच सोलापुरात भाजप आणि काँग्रेस यांच्यात प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. प्रत्यक्ष प्रचारांच्या मुद्यांपेक्षा भाजपाचे उमेदवार आ. राम सातपुते आणि काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्यात व्यक्तिगत आरोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत.

सोलापुरातून अनेक वर्षे सत्ताकारणात प्रतिनिधित्व केलेले ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी कमावलेल्या मालमत्तेचा हिशेब द्यावा, असे आव्हान आ. सातपुते यांनी दिले तर लागलीच त्याला प्रतिउत्तर म्हणून आ. शिंदे यांनी माझ्या वडिलांवर का टिका करता माझ्यावर टिका करा ना, तुमच्या विरोधात मी उमेदवार आहे, मला बोला माझ्या वडिलांना बोलताना तुम्हाला लाज कशी वाटत नाही, अशी जोरदार टीका केली आहे.

सोलापूर लोकसभा राखीव मतदारसंघात काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे आणि भाजपचे आमदार राम सातपुते यांच्यातील थेट लढतीला आ. सातपुते यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून रंग चढत आहे. दोन्ही बाजूंनी दारूगोळा तयार असून आरोप-प्रत्यारोपाचे फटाके फुटताना दिसत आहेत. आगामी काळातही दोघांमध्ये चांगलेच खटके उडणार आहेत, यात शंका नाही. गुरूवारी आ. सातपुते आणि आ. शिंदे यांच्यात व्यक्तिगत पातळीवरून खडाजंगी झाल्याचे पहायला मिळाले.

### 'इथं' पडली वादाची ठिणगी?

काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आ. सातपुते पहिल्यांदाच आमदार झाले तर कोट्यवधींचा बंगला बांधला कसा, थाटात माटात लग्न केले कसे, असे प्रश्न विचारात त्यांचे पूर्वीचे झोपडीतले फोटो आणि आत्ताचे बंगल्यातले फोटो सोशल मिडीयावर अपलोड केले. त्यानंतर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी बुद्धीचे बाल विकणाऱ्या सुशीलकुमार शिंदेंकडे परदेशात बंगले, जमिनी कोठून आल्या असा सवाल उपस्थित केला. यावरून आ. शिंदे आणि आ. सातपुते यांच्यात खडाजंगी सुरू झाली.

### मीही हिशोब देतो, तुम्हीही संपत्ताचा हिशोब द्याः सातपुते

आपले आई-वडील ऊसतोड कामगार होते. आम्ही साध्या झोपडीत राहायचो. पण माझे शिक्षण बी. टेकपर्यंत झाले असून पत्नीही बी. टेक आहे. तिची आयटी कंपनी आहे. बँक कर्ज काढून बंगला बांधला आहे. पत्नीच्या वडिलांनी आपल्या मुलीसाठी लग्नात खर्च केला, हे प्रत्येक वडील मुलीच्या लग्नात करतोच. त्याचा संपूर्ण हिशेब आपण द्यायला तयार आहोत. परंतु, वर्षानुवर्षे सत्तेत राहिलेल्या सुशीलकुमार शिंदे यांनीही त्यांनी कमावलेल्या मालमत्तेचा हिशेब द्यावा, दुसरीकडे मुख्यमंत्री, ऊर्जामंत्री, गृहमंत्री पद भूषवले, किती विकास केला याचा हिशोबही त्यांनी द्यावा असे आव्हान करत साधे विमानतळ शिंदे यांना सुरू करता आले नाही, अशी टीका सातपुते यांनी केली.

### लोकांना ठरवू द्या कोण काबील आहे तेः आ. शिंदे

आज मी आणि सुप्रिया ताई संविधान वाचवण्यासाठी लढत आहोत, भिडत आहोत, या संविधान विरोधी राक्षसी शक्तीच्या विरोधात, आणि आमचे दोघींचे वडील वणवण फिरत आहेत, पक्षासाठी फिरत आहेत. माझ्या वडिलांवर का टिका करता माझ्यावर टिका करा ना, तुमच्या विरोधात मी उमेदवार आहे, मला भिडा ना, पराभव समोर दिसू लागल्याने पायाखालची वाळू सरकली आहे तुमच्या, एवढा संघर्ष माझ्या वडिलांनी केला, त्यांना बोलताना काहीच वाटत नाही. 'अब राजा का बेटा राजा नही बनेगा,जो काबील है वही बनेगा''मग सोलापुरात केलेल्या लोक हिताच्या कामांबद्दल बोला आणि लोकांना ठरवू द्या कोण काबील आहे ते!

## तुझ्या गळा माझ्या गळा

**सोलापूर लोकसभेसाठी भाजपातर्फे आमदार राम सातपुते यांची उमेदवारी घोषित होऊनसुद्धा अजित पवार राष्ट्रवादी गट तटस्थ होता. तथापि, भाजप उमेदवाराचे काम करा, असे फर्मान अजित पवार यांनी मुंबईतून सोडल्यानंतर सोलापुरातील अजित पवार राष्ट्रवादी तत्काळ ॲक्शन मोडवर आली. राष्ट्रवादी भवनात 'पॉवर'बाज बैठक झाली. आमदार राम सातपुते यांना निवडून आणण्याचा निर्धार उपस्थितांनी केला. अजित पवार राष्ट्रवादी गट आणि भाजपा हे एकत्रित आल्याचे दिसले. 'तुझ्या गळा माझ्या गळा, गुंफू 'रामा'च्या विजयासाठी माळा' असचं काहीसं झालं.**

दरम्यान, विजय शिवतारे यांनी बारामतीत राष्ट्रवादीचे काम करण्याचे मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत मान्य केले. त्यानंतर आज राष्ट्रवादी भवनात तातडीने बैठक झाली. महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या उमेदवारीवर खणखणीत भाषणं झालं. सातपुते यांच्या विजयासाठी अजित पवार राष्ट्रवादी गटाची 'पॉवर'बाज ताकद लावू, असे अभिवचन यावेळी शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान तसेच नेते आनंद चंदनशिवे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी दिले.

'कमळा'च्या चिन्हावर जरी निवडून येत असलो तरी राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांना विसरणार नाही, असे आमदार राम सातपुते यांनी सांगितले. तर संतोष पवार म्हणाले, अजितदादा हे आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ शक्तीस्थळ आहेत, त्यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे काम करू. याप्रसंगी आमदार विजयकुमार देशमुख, भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्यासह अजित पवार राष्ट्रवादी गट तसेच भाजपाचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रणजितदादांना वाटतं गड्या आपलं 'कमळ' बरं पण...

**माढा लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी भाजप पक्षाकडे उमेदवारी मागितली होती, त्याचबरोबर धैर्यशील मोहिते-पाटील यांनीही पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. या दोन्ही गटाबरोबर पक्षातील एक तिसरा प्रवाह असा म्हणत होता की स्वतः प्रशांत परिचारक यांनी या निवडणुकीत उभे राहावे. परंतु, भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी या तीन पक्षांची युती असल्याने या तिन्ही पक्षांनी मिळून उमेदवारीबाबतचा निर्णय घ्यायचा होता. अखेर भाजपा केंद्रीय नेतृत्वाने रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांची उमेदवारी माढा मतदारसंघातून जाहीर केली. या उमेदवारीबाबत नाराजी प्रकट केल्यानंतर काही कार्यकर्त्यांनी, मोहिते-पाटलांनी याबाबत वरिष्ठांकडे उमेदवार बदलण्याची मागणी केली. मात्र, याबाबत पक्षाचे कोणतंही लक्षण उमेदवारी बदलण्याबाबत दिसत नाही**



क्लस्टर प्रमुख प्रशांत परिचारक यांनी याबाबत सांगितले की, माढ्यातील नाराजीबाबत मी मोहिते-पाटील यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. पक्षात कोणी नाराज असेल तर ती दूर करण्याचे काम क्लस्टर प्रमुख म्हणून माझे आहे. माढ्यात उपमुख्यमंत्री फडणवीस, खासदार निंबाळकर, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, मतदार संघातील काही प्रमुख कार्यकर्त्यांसह बैठक झाली. खासदारांबाबत तक्रारी मांडल्या. त्यानंतर फडणवीस, रणजितसिंह नाईक निंबाळकर, रणजितसिंह मोहिते पाटील यांच्यात बैठक झाली. सर्व कार्यकर्त्यांना वाटले की माढ्याचा तिढा सुटला.परंतु सोशल मीडियाच्या माध्यमातून टीकाटिप्पणीतून गैरसमज वाढले. रणजितसिंह यांनी मला अकलूजला बोलावून घेतले. आपण चर्चा करूया, असे सांगितले. कारण पक्षाच्या विरोधात जाण्याची त्यांची भूमिका अजूनही नाही. परंतु कार्यकर्त्यांचा ग्रह आहे की खासदारांकडून त्रास होत आहे. खासदार निंबाळकर यांचे असे म्हणणे होते की, गत निवडणूकीत सहकार्य करणारे कार्यकर्ते मोहिते-पाटील समर्थक नव्हते. त्यांच्याशी प्रतारणा योग्य नाही. अशी वेगवेगळ्या भूमिकेत मेळ घालण्याची जबाबदारी माझी होती.

अकलूजला रणजितदादा आणि त्यांच्या कुटुंबासोबत चर्चा केली. तेव्हा रणजितदादांनी कुटुंबियांना सांगितले की, फडणवीस यांनी मदत केली आहे. विजयदादांवर राष्ट्रवादीत अन्याय झाला. त्यामुळे त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. भाजपाने त्यांचा सन्मान ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु घडलेल्या घटना विसरून पुन्हा एकदा काम करावे अशी प्रदेशची इच्छा होती. तसा निरोप आम्ही त्यांच्यापर्यंत पोहोचला होता. रणजित दादांनी समन्वयाची भूमिका घेतली. परंतु आता कुटुंब का पक्ष या कात्रीमध्ये रणजितसिंह मोहिते पाटील सापडलेले दिसतायेत.

# चूक कोणाची? मोहिते-पाटलांची की भाजपची?

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**मोहिते पाटील यांना १९५२ पासून सामाजिक,राजकीय वारसा असताना भाजपने त्यांना फक्त गेली पाच वर्षे ताकद पुरवण्याचे काम केले त्याची परतफेड देखील मोहिते-पाटील यांनी पुरेपूर केली आहे.आता प्रश्न पडतो की एवढं सगळं असूनदेखील मोहिते-पाटलांची ताकद ओळखण्यात भाजप पक्ष खरोखरच कमी पडला होता का? भाजपच्या नेतृत्वाला मोहिते-पाटलांची खरी ओळख झालीच नव्हती का? मोहिते -पाटलांचा तळागाळापर्यंतचा असणारा संपर्क भाजपला कळालचं नाही का? जर कळाला होता तर मोहिते-पाटील विरोधकांना बळ देऊन भाजपने सोलापूर जिल्ह्यात काय कमावले? मोहिते-पाटील यांनी भाजप पक्ष सोडावा व राष्ट्रवादीत प्रवेश करावा तरीही भाजपच्या वरिष्ठांकडून कोणतीही हालचाल न व्हावी, हे थोडे अनाकलनीयच होते. असो. माढा लोकसभेची निवडणूक भाजप विरूद्ध मोहिते-पाटील अशीच जरी ठरणार असली तरीही मोहिते पाटील यांना ओळखण्यात भाजपाचे चुकले की शिस्तप्रिय भाजपाच्या वळचणीला राहताना मोहिते-पाटील यांना 'भाजप' पक्ष कळला नाही?**

अकलूजचे मोहिते-पाटील घराणे आणि माढा लोकसभा मतदारसंघ यांच्यात दररोज काहीतरी राजकीय घडामोडी घडत आहेत.बुधवारी अकलूजच्या 'शिवरत्न' वर अशीच एक राजकीय घटना घडली की ज्या मोहिते-पाटलांनी २०१९ मध्ये भाजप पक्षात प्रवेश केला होता तेच मोहिते पाटील आता शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षात घर वापसी करणार हे निश्चित झाले आहे. मोहिते-पाटील यांच्यासारखे मातब्बर, राजकीय घराणे भाजपमधून बाहेर पडतेय, ज्या भाजपमध्ये फक्त 'इनकमिंग'च आहे, अशा पक्षातून मोहिते पाटलांनी 'आउटगोईंग' का करावे? याचा अर्थ शोधण्याचा हा लेखाजोखा.....

**इतिहासात डोकावताना :** १९५२ ते २००९ या ५७ वर्षात अपवादात्मक परिस्थिती वगळता मोहिते-पाटील कुटुंबीयांची निर्विवाद आणि एक हाती सत्ता माळशिरस तालुक्यात राहिली त्याची परिणीती म्हणूनच महाराष्ट्रभर मोहिते-पाटील नावाचा दबदबा निर्माण झाला होता. १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती झाल्यानंतर या कुटुंबियांचा राजकीय आलेख वाढतच गेला. जिल्हा दूध संघ, जिल्हा मध्यवर्ती बँक, जिल्हा परिषद यांच्या निवडणुकीचे केंद्रस्थान अकलूजचे 'शिवरत्न' हेच होते. काळाच्या ओघात मोहिते -पाटलांना पक्षांतर्गतच विरोधक वाढू लागले.या गोष्टीचा अखेर २०१९ साली राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिट्ठी देत भाजपत त्यांनी प्रवेश केला.

**भाजपचा दबाव :** मार्च २०२४ मध्ये मोहिते-पाटील यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देण्याचे जणू ठरवलेच. शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांना मोहिते-पाटील कुटुंबियाची अकलूज येथे भेट घेतल्यानंतर एक प्रश्न विचारण्यात आला की, मोहिते-पाटील कुटुंबीय यांनी भाजपा पक्ष सोडू नये, म्हणून त्यांच्यावर भाजपाचा दबाव आहे का? त्यावर त्यांनी दिलेले उत्तर खूप मार्मिक होते. 'मोहिते-पाटील कुटुंबाच्या राजकीय किंवा सामाजिक क्षेत्रातील संघर्षात भाजपाचा काहीही वाटा नाही. मोहिते पाटील कुटुंबीयांना भाजपाने बनवले नाही तर, ते स्वयंभू आहेत तसेच भाजपला सोलापूर जिल्ह्यात वाढविण्यात मोहिते-पाटलांचा वाटा मोठ्या प्रमाणात आहे'

जल्ह्यात मोहिते-पाटील यांना मानणारा वर्ग आहे. त्यांना जिल्ह्यात भाजपने ताकद दिली असती तर ते संपूर्ण जिल्हा भाजपमय करू शकले असते. परंतु, भाजपला त्यांच्या विरोधकांना ताकद देण्यात जास्त रस होता. माढ्याचा खासदार, माळशिरसचा, पंढरपूर- मंगळवेढा पोट निवडणुकीचा आमदार भाजपचा होण्यात मोहिते-पाटलांनी स्वतःची शक्ती पणाला लावली नसती. या तिन्ही निवडणुकीत या कुटुंबातील सदस्य निवडणुकीला सामोरे गेले नव्हते. परंतू, प्रचाराची जबाबदारी मात्र संपूर्ण कुटुंबीयांनी खांद्यावर घेतली होती.

### फडणवीसांनी चेंडू टोलवला मोहिते-पाटलांच्या कोर्टात

माढा लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचं काम करायचं की अन्य पर्याय काढायचा यासंबंधीचा निर्णय मोहिते-पाटील परिवारानेच घ्यावा, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांना आज गुरुवारी पुन्हा सांगत चेंडू मोहिते-पाटील यांच्या कोर्टात टोलवला आहे. आज आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. विद्यमान खासदार नाईक-निंबाळकर यांना पुन्हा उमेदवारी दिल्यानं मोहिते-पाटील परिवार नाराज झाला आहे. ही नाराजी फडणवीस हे दुर करतील, अशी आशा आमदार रणजितसिंह यांना वाटत होती. त्यासाठी आज फडणवीसांची पुन्हा भेट घेतली. रणजितसिंह हे धर्मसंकटात सापडले आहेत. त्यांच्या कुंटुंबियांकडून माढा लोकसभा लढण्यासाठी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाचा पर्याय काढला जात आहे. तर दुसरीकडं भाजपाकडून मोहिते-पाटील परिवाराची नाराजी दुर केली जात नाही. विशेषत्वे, परिवारानेच रणजितसिंह यांना लोकसभेची निवडणूक होईपर्यंत वाळीत टाकले आहे.



**रामराजे निंबाळकरांच्या निर्णयाचे काय? :** आज गुरूवारीच ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर हे मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटल्याचं वृत्त आहे. मात्र, अजित पवारांनी महायुतीच्या उमदेवाराचं काय करण्याबद्दल सांगितलं का? भाजपाचे माढ्याचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचं काम करणार हा महत्वाचा प्रश्न अनुत्तरीतच राहात आहे. विजय शिवतारे तसेच हर्षवर्धन पाटील यांच्यासंदर्भात महायुतीचे काम करण्याचे निर्णय झाले, राजराजे निंबाळकर यांनी महायुतीच्या उमेदवाराचे काम करावे, हा निर्णय महायुतीचा धर्म म्हणून अपेक्षितच असल्याचे मानले जाते.

**मागणी साधीच पण :** ऐन लोकसभेच्या तोंडावरती मोहिते-पाटलांनी भाजपामध्ये प्रवेश केला. प्रवेश करतेवेळी मोहिते-पाटील कुटुंबियातील कोणत्याही सदस्यांनी लाभाचे पद मागितले नव्हते किंवा राजकीय पुनर्वसन करण्याची मागणी केली नव्हती. कृष्णा भीमा स्थिरीकरण हा लोकोपयोगी प्रकल्प मार्गी लावावा एवढी साधी मागणी मोहिते पाटील कुटुंबीयांनी केली होती.